आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१३ ऑक्टोबर २०२६ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- भारताची प्रगती सामूहिक विकास आणि सर्वांना समान संधी उपलब्ध करून देण्याच्या तत्त्वावर आधारित आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडून सहा राज्यांच्या राज्यपालांची नियुक्ती

- मुख्य निवडणूक आयुक्त आणि एसआयआर विरोधात झालेल्या आंदोलनांबाबतच्या सर्व याचिकांवरची सुनावणी सर्वोच्च न्यायालयानं १५ ऑक्टोबरपर्यंत पुढे ढकलली

**आणि**

- मानवतेविरुद्धच्या गुन्ह्यांच्या निकषात बसणाऱ्या दहशतवादी कृत्यांचा समावेश यासंदर्भातल्या प्रस्तावित आंतरराष्ट्रीय करारात करावा, अशी भारताची संयुक्त राष्ट्रांकडे मागणी

**<><><><><>**

भारताची प्रगती सामूहिक विकास आणि सर्वांना समान संधी उपलब्ध करून देण्याच्या तत्त्वावर आधारित आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. ते आज नवी दिल्लीत आयोजित ब्लूमबर्ग न्यू इकॉनॉमी फोरममध्ये बोलत होते. केवळ स्वतः पुढे जाण्याची क्षमता म्हणजे सामर्थ्य नव्हे, तर इतरांनाही सक्षम करण्याची क्षमता म्हणजे खरं सामर्थ्य, असंही ते म्हणाले. केंद्र सरकारनं आपल्या प्रशासनाच्या दृष्टिकोनात आणि कार्यसंस्कृतीत 'सक्षमीकरणासाठी सामर्थ्य' या तत्त्वाचा अंगीकार केल्याचं त्यांनी सांगितलं. सध्याच्या काळात डिजिटल सामर्थ्य हा परिवर्तनाचा प्रमुख प्रेरक असून डिजिटल सामर्थ्यामुळे भारतासाठी अधिक व्यापक संधी खुल्या झाल्या आहेत, असं त्यांनी सांगितलं.

**होल्ड…बाईट - प्रधानमंत्री**

एकविसाव्या शतकात तंत्रज्ञान, माहिती, ज्ञान आणि नवोन्मेष हे सामर्थ्याचे महत्त्वाचे स्त्रोत बनले आहेत. भारताची क्षमता इतर देशांसाठीही संधींची नवी दालनं खुली करेल, यासाठी सरकार सातत्यानं प्रयत्नशील असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल सहा राज्यांच्या राज्यपालांची नियुक्ती केली. केरळम, तामिळनाडू, सिक्कीम, ओडिशा, कर्नाटक आणि उत्तराखंड या राज्यांसाठी या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. सिक्कीमचे विद्यमान राज्यपाल ओम प्रकाश आता केरळमचे तर केरळमचे विद्यमान राज्यपाल राजेंद्र आर्लेकर आता तामिळनाडूचे राज्यपाल असतील. दुष्यंत गौतम सिक्कीमचे, ब्रिज मोहन राम ओडिशाचे, डॉ. सुधा यादव कर्नाटकच्या तर डॉक्टर ढाल सिंह बिसेन उत्तराखंडचे राज्यपाल म्हणून नियुक्त झाले आहेत.

<><><><>

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने २०२६-२७ या वर्षात भारताचा सकल राष्ट्रीय उत्पादन दर अर्थात जीडीपीचा दर ७ टक्के पर्यंत वाढण्याचा अंदाज वर्तवला आहे. जुलै २०३६ मध्ये हा दर ६ पूर्णांक ४ दशांश होता. जागतिक आर्थिक आऊटलुक अहवालात अस्थिर जागतिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर भारत अनुमानापेक्षा वेगानं आर्थिक प्रगती करत असल्याचं नमूद केलं आहे. जागतिक स्तरावर इंधनाच्या किंमती वाढत्या असल्या तरी देशांतर्गत मजबूत मागणी आणि सेवा क्षेत्रातली प्रगती यामुळे जीडीपी दरात वाढ झाल्याचंही यात म्हटलं आहे.

<><><><>

नवी दिल्ली इथं आज बिमस्टेक अर्थात बंगालच्या उपसागरातल्या बहुक्षेत्रीय तांत्रिक आणि आर्थिक सहकार्यासाठीच्या उपक्रमाची पहिली गृहमंत्रीस्तरीय बैठक होत आहे. ही ऐतिहासिक बैठक दहशतवाद, आंतरराष्ट्रीय संघटित गुन्हेगारी, अंमली पदार्थांची तस्करी, कट्टरतावाद, मानवी तस्करी, बेकायदेशीर आर्थिक व्यवहार आणि सायबर धोक्यांचा मुकाबला करण्यासाठी सदस्य देशांचा सामूहिक निर्धार अधोरेखित करते, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे. ठोस समन्वयाच्या माध्यमातून अधिक सुरक्षित, मजबूत आणि संरक्षित बिमस्टेक क्षेत्र उभारण्यासाठी सर्व सदस्य देश वचनबद्ध असल्याचं त्यांनी सांगितलं.

बंगालच्या उपसागराच्या किनाऱ्यावरच्या आणि परिसरातल्या देशांमध्ये आर्थिक आणि तांत्रिक सहकार्य वाढवणं, हे या संघटनेचं उद्दिष्ट आहे.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून कामाला सुरुवात केली त्याला २५ वर्षं झाली. या काळात ते आधी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून आणि नंतर भारताचे प्रधानमंत्री म्हणून सलग कार्यरत आहेत. जनसेवा ते देशसेवा असा हा प्रवास सेवा आणि सुशासनाच्या

मार्गावरुन विकसित भारत २०४७च्या दिशेने होत आहे. सर्वसमावेशक विकास, सामाजिक सक्षमीकरण, आणि समर्पण भावाचा हा प्रवास सर्वसामान्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणत आहे. यानिमित्तच्या विशेष मालिकेत आज आपण जाणून घेणार आहोत प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेविषयी

**होल्ड- व्हीसी (५८ सेकंद)**

*(सन २०१६ मध्ये सुरू करण्यात आलेल्या 'प्रधानमंत्री उज्ज्वला योजने'चा उद्देश गरीब कुटुंबांतील महिलांसाठी स्वयंपाकाचं स्वच्छ इंधन ही प्रतिष्ठेची, आरोग्याची आणि समान संधीची बाब बनवणे हा होता. एलपीजीकडे केवळ मध्यमवर्गीयांची सोय म्हणून न पाहता, या योजनेअंतर्गत गॅस कनेक्शन महिलांच्या नावावर देण्यात आलं. यामुळे लाखो कुटुंबांना सरपण, शेणाच्या गोवऱ्या आणि इतर प्रदूषणकारी इंधनांपासून दूर नेण्यास मदत झाली, तसंच घरातल्या निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढण्यासही वाव मिळाला. यंदा मे महिन्यापर्यंत गरीब कुटुंबांतील महिलांना १० कोटी ५० लाखांपेक्षा अधिक मोफत एलपीजी कनेक्शन्स देण्यात आली होती.*

*या योजनेचा विस्तार इंधनाच्या निरंतर वापराला प्रोत्साहन देण्याच्या दिशेनेही झाला. याचे फायदे केवळ स्वयंपाकघरापुरते मर्यादित नसून स्वच्छ इंधनामुळे घरातील वायू प्रदूषणाचा धोका कमी होतो, तर सरपण गोळा करण्यात जाणारा वेळ वाचल्याने महिलांना शिक्षण, मोबदला मिळवून देणारे काम आणि उत्पन्न वाढवणाऱ्या उपक्रमांसाठी अधिक संधी उपलब्ध होतात.)*

**<><><><>**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि एसआयआरच्या विरोधात दिल्लीत झालेल्या आंदोलनांबाबतच्या सर्व याचिकांवरची सुनावणी सर्वोच्च न्यायालयानं १५ ऑक्टोबरपर्यंत पुढे ढकलली आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या पीठासमोर आज ही सुनावणी होणार होती, पण न्यायमूर्ती मोहना यांची प्रकृती बरी नसल्यामुळे ती पुढे ढकलण्यात आली. आंदोलनादरम्यान महिला पत्रकारांवर पोलिसांनी बळाचा अवाजवी वापर केल्याच्या कथित प्रकरणी, दिल्ली पोलिसांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यानं न्यायालयात हजर राहावं, असं आज पीठानं सांगितलं. मेट्रो सेवा आणि रेल्वेंबद्दल ९ ऑक्टोबर रोजी न्यायालयानं दिलेल्या आदेशांच्या पालनासंदर्भातला

अहवाल सादर करण्याचा वेळही पीठानं वाढवून दिला. मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्त कायदा २०२३ला आव्हान देणाऱ्या याचिकेवरही न्यायालयानं नोटिस बजावली.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याबद्दल कथित अवमानकारक टिप्पणी केल्याबद्दल काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याविरोधातल्या फौजदारी अवमान प्रकरणाला सर्वोच्च न्यायालयानं तात्पुरती स्थगिती दिली आहे. हे प्रकरण रद्दबातल ठरवण्याच्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या राहुल गांधींच्या याचिकेवर न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती अपरेश कुमार यांनी राज्य सरकारला नोटिस बजावली असून ४ आठवड्यांच्या आत उत्तर मागवलं आहे.

**<><><><>**

मानवतेविरुद्धच्या गुन्ह्यांच्या निकषात बसणाऱ्या दहशतवादी कृत्यांचा समावेश, यासंदर्भातल्या प्रस्तावित आंतरराष्ट्रीय करारात करावा, अशी मागणी भारतानं संयुक्त राष्ट्रांत केली आहे. संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेच्या सहाव्या समितीच्या बैठकीत बोलताना भारताच्या प्रतिनिधी आर. मैथिली यांनी ही भूमिका मांडली. नागरिकांचं संरक्षण, गंभीर गुन्ह्यांसाठी जबाबदारी निश्चित करणं आणि राष्ट्रीय सार्वभौमत्वाचा आदर राखणं आवश्यक असल्याचं त्यांनी सांगितलं. त्याचबरोबर, आरोपींच्या अधिकारांचा आणि पीडितांच्या हितांचाही आदर केला पाहिजे, असं त्यांनी स्पष्ट केले.

हा करार २०२८ मध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेत स्वीकारला जाईल अशी अपेक्षा आहे.

**<><><><>**

सीजेपीचे सौरव दास आणि आशुतोष रांका यांना आज सकाळी पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. दिल्ली इथे जंतरमंतर या ठिकाणी आंदोलनासाठी पोचलेल्या या सीजेपीच्या नेत्यांबरोबर अजिंक्य शिंदे यालाही अटक केल्याची माहिती अभिजित दिपके यांनी आपल्या समाजमाध्यमातल्या संदेशातून दिली आहे.

**//<><><><>//**